**(न्यायनिर्णय)**

**भाग- अ**

MHAU030108262024

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | : २४/०४/२०२४ |
| नोंदणी दिनांक | : २४/०४/२०२४ |
| निकाल दिनांक | : ०५/०५/२०२६ |
| कालावधी | : ०२ ०० ११<br>वर्षे महिने दिवसे |

**औरंगाबाद येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी : पी. आर. पालवे )**
**-: न्यायनिर्णय :-**

(घोषित दिनांक:- ०५/०५/२०२६)

**नियमीत फौजदारी खटला क्र.११०७/२०२४,** **निशानी क्रं. २४**

**गु.र.नं. I २६७/२०२३**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन व्दारा,<br>जवाहरनगर पो.ठाणे. औरंगाबाद.<br>गु. र. क्रमांक २६७/२०२३ |
| **अभियोग पक्षाकरिता मा. विधीज्ञ** | सहा.सरकारी अभियोक्ता<br>श्री. आर. व्ही. शेळके |
| **आरोपी** | ओम बाबासाहेब बरांडे, वय २४ वर्षे<br>रा. शिवाजी नगर, नेहरु कॉलेज<br>समोर, छत्रपती संभाजीनगर. |
| **आरोपीकरिता मा. विधीज्ञ** | श्री. जे.डी. शिंदे |

**भाग - ब**

| | |
|---|---|
| **गुन्हयाचा दिनांक** | ०३/११/२०२३ |
| **प्रथम खबर अहवाल दिनांक** | ०४/११/२०२३ |
| **दोषारोपपत्र दिनांक** | २२/०४/२०२४ |
| **दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक** | १४/१०/२०२५ |
| **पुरावा सुरु झाल्याचा दिनांक** | ११/१२/२०२५ |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक** | लागू नाही |

| | |
|---|---|
| **न्यायनिर्णय घोषीत केल्याचा दिनांक** | ०५/०५/२०२६ |
| **शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास** | लागू नाही |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीन वर सुटल्या चा दिनांक | दोषरोप कलम | निर्दोषमुक्त / शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी प्रकिया संहिता कलम ४२८ नुसार खटल्याकामी आरोपीचा असलेला न्यायाधीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ओम बाबासाहेब बरांडे | आरोपीस सी.आर. पी.सी. कलम ४१ (अ) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. | निरंक | भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४, आणि ५०४. | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०५/०५/२०२६)

आरोपींविरुध्द **भारतीय दंड विधान कलम ३२३, ३२४ आणि ५०४** अन्वये अपराध केल्याबाबत प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

## अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे

**०२.** दि.०३.११.२०२३ रोजी आदित्य हॉटेलसमोर रात्री १०.३०. वाजता आरोपी व अतुल राव हे भांडण करत होते. ते भांडण सोडवण्याकरीता फिर्यादी गेला असता त्यांना समजाउन सांगुन वाद मिटला त्यानंतर फिर्यादी व अतुल राव अतुलच्या च्या गाडीवर रोपळेकरकडुन जवाहरनगरकडे जाणा-या रोडवर व्यसन मुक्ती केंद्रकडे पुढे गेला असता फिर्यादीचा मित्र अतुल यास

मारहाण कराणारा आरोपी व ईतर दोन इसम तेथे आले. आरोपी फिर्यादीस म्हणाला की, तु आमचे भांडण का सोडवले व आमच्या भांडणात का आलास व त्याचा राग मनात धरुन आरोपीने फिर्यादीस शिविगाळ करुन हाताचापटाने बुक्क्याने मारहाण केली व लाकडी दांडयाने फिर्यादीच्या कपाळावर जोरात मारले. म्हणून फिर्यादीने आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

**०३.** सदर फिर्यादीवरून जवाहरनगर पोलीसांनी गु.र.नं. । २६७/२०२३ दाखल करून तपासी अधिकारी, आर.वाय. जाधव यांनी गुन्हयाचा सखोल तपास केला व आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्यामुळे त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपी हजर झाल्यानंतर आरोपींविरुध्द **भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३ आणि ५०४** अन्वये **निशाणी ०७** वर दोषारोप ठेवण्यात आले असता आरोपीने दोषारोप नाकारून प्रकरण चालवण्याची विनंती केली. म्हणून आरोपीविरुध्द खटला चालविण्यात आला.

**०५.** आरोपीने त्याच्या बचावाकरिता कोणताही तोंडी पुरावा दिला नसुन साक्षीदार तपासले नाही. आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा उपलब्ध न झाल्याने आरोपीचे **फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३** नुसार निवेदन नोंदविण्यात आले नाही. तसेच फिर्यादीने **निशाणी २०** वर तडतजोड पुरसीस दाखल केली आहे. तसेच **निशाणी २३** अन्वये मुळ फिर्यादीतर्फे पुरावा बंद करण्यात आला. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

**०६.** अभियोग पक्षाने दिलेला साक्षीपुरावा लक्षात घेता, खालील मुद्दे निर्णयाकरिता उपस्थित केले असून त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत येणेप्रमाणे दिले आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक ०३/११/२०२३ रोजी जवाहर नगर रोड येथे | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | आरोपी याने फिर्यादी याच्या मृत्यूस कारण होण्याचा संभव आहे असा 'लाकडी दांडा' हे हल्ल्याचे हत्यार म्हणून वापरून आरोपीने फिर्यादीस  डोक्यात मारहाण करून, इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली आणि त्या परिणामी **भारतीय दंड विधान कलम ३२४** अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | |
| ०२ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस  गावचे शिवारात फिर्यादी यास आरोपीने हाताचापटाने व बुक्कयांनी मारहाण करून त्याला इच्छापुर्वक किरकोळ दुखापत पोहचविली, म्हणून आरोपीने **भारतीय दंड विधानाचे कलम ३२३** अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| ०३ | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी, फिर्यादीकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अगर कोणताही अपराध घडावा या उद्देशाने त्याला शिवीगाळ करून अपमानीत करून उदयुक्त केले आणि त्या परिणामी आरोपीने **भारतीय दंड विधानाचे कलम ५०४** अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| ०४ | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

०७. प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण दोन साक्षीदार तपासले आहे. त्यातील साक्षीदार क्र. १ संदीप गौतम वाहुळ यांना निशाणी ११ वर, साक्षीदार क्र. २ सुरजकुमार चौधरी यांना निशाणी २१ वर तपासले आहे.

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ३ करिता :-**

०८. प्रस्तुत मुद्दयांच्या अनुषंगाने सर्व प्रथम हे नमूद करणे आवश्यक आहे की, अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. २ (फिर्यादी) सुरजकुमार चौधरी यांच्या साक्षीपुराव्यात त्यांनी कथन केले आहे की, दिनांक ०३/११/२०२३ रोजी आरोपी व फिर्यादीमध्ये किरकोळ वाद झाले होते. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द फिर्याद दिली होती. परंतु, फिर्यादीमधील मजकूराबाबत फिर्यादीला काही सांगता येणार नाही. फिर्यादी पुढे असे कथन करतो की, असे काही घडले नव्हते की, आरोपीने त्याला लाकडी दांडयाने किंवा लाथाबुक्क्यांनी मारहाण केली होती.

०९. वर नमूद तोंडी पुराव्याच्या आधारावर असे दिसून येते की, अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र. २ (फिर्यादी) सुरजकुमार चौधरी यांनी अभियोग पक्षास सहकार्य न करता अभियोगपक्षाचे संपूर्ण कथन नाकारले. फिर्यादीने अभियोग पक्षाचे कथन नाकारल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. डब्ल्यू शेळके यांनी फिर्यादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली असता, फिर्यादीचा उलटतपास अभियोग पक्षातर्फे घेण्यात आला. मात्र अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासादरम्यान त्याने फिर्यादमधील संपुर्ण मजकुर नाकारला असून, त्याला काहीही सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे.

१०. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. १ (साक्षीदार) संदीप गौतम वाहुळ यांच्या साक्षीपुराव्यात त्यांनी कथन केले आहे

की, तो घटनास्थळी गेला होता त्याच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा बनवण्यात आला होता. साक्षीदाराने उलटतपासादरम्यान मान्य केले की, त्याला मराठी लिहीता वाचता येते. त्याला पंचनाम्यास हजर राण्यासाठी कोणतीही नोटीस मिळाली नव्हती. तो पोलीसांना म्हणाला होता की, मला कोर्ट कचेरीच्या कामात पाडू नका.

११. तसेच प्रस्तुत साक्षीदार हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणुन तपासण्यात आला. परंतु, पुराव्यादरम्यान तो असे कथन करतो की, फिर्यादी हा त्यांच्याकडे कामाला होता, त्याने घटनेबददल काय सांगितले होते हे त्यांना माहीती नसल्याचे त्याने सांगितले.

**११.** वर नमूद तोंडी पुराव्याच्या आधारावर असे दिसून येते की, अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ (साक्षीदार) याने अभियोगपक्षास सहकार्य न करता अभियोगपक्षाचे संपूर्ण कथन नाकारले. साक्षीदार क्र.१ ने अभियोगपक्षाचे कथन नाकारल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. डब्ल्यू. शेळके यांनी साक्षीदार क्र.१ चा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली असता, साक्षीदार क्र. १ चा उलटतपास अभियोग पक्षातर्फे घेण्यात आला. मात्र अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासादरम्यान सर्व उत्तरसूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

**१२.** वर नमूद तोंडी पुराव्याच्या आधारावर असे दिसून येते की, अभियोग पक्षाचे क्र. १ (साक्षीदार) संदीप गौतम वाहुळे व साक्षीदार क्र.२ (फिर्यादी) सुरजकुमार चौधरी यांनी अभियोगपक्षास सहकार्य न करता अभियोग पक्षाचे संपूर्ण कथन नाकारले. साक्षीदार क्र. ०१ व ०२ ने अभियोगपक्षाचे कथन नाकारल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. डब्ल्यू. शेळके यांनी साक्षीदार क्र. ०१ व ०२ चा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली असता, साक्षीदार क्र. ०१ व ०२ चा अभियोगपक्षातर्फे उलटतपास घेण्यात आला. मात्र अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान साक्षीदारांनी सर्व उत्तरसूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

**१३.** कोणत्याही गुन्हयाची सिध्दता होण्याकरिता प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व पंच साक्षीदार यांची साक्ष अभिलेखावर असणे आवश्यक असते. पंच साक्षीदार, तसेच घटनास्थळ पंच, इतर स्वतंत्र साक्षीदार हे खटल्याच्या सिध्दतेकरिता महत्वाचे दुवे असतात. परंतु, प्रस्तुत फिर्यादी व साक्षीदार यांनी घटना व अभियोग पक्षाचे कथन नाकारल्यामुळे या प्रकरणात उद्देश व तयारी या दोन्ही तत्त्वांचा अभाव आहे. अभियोगपक्षाने आरोपीवर **भारतीय दंड विधान कलम ३२३, ३२४ आणि ५०४** अन्वये ज्या कलमांनुसार दोषारोपपत्र दाखल केलेले आहे, त्याप्रमाणे अनुषंगिक घटक मुळ फिर्यादी व साक्षीदार यांनी घटना नाकारल्यामुळे पुराव्यानिशी आरोप सिध्द झालेले नाही.

**१४.** प्रस्तुत खटल्यामध्ये घटनास्थळ हे स्वतंत्र साक्षीदारांमार्फत सिध्द झालेले आहे. परंतु, जेव्हा फिर्यादी हा स्वत:च खटल्यास सहाय्य करत नाही व कोणताही स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नाही. अशावेळी फक्त घटनास्थळ पंचनाम्याच्या आधारावर आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द झाला असे म्हणता येणार नाही.

**१५.** उपरोक्त चर्चेच्या आधारावर फिर्यादी सुरजकुमार चौधरी यास दि. ०३.११.२०२३ रोजी आदित्य हॉटेलसमोर रात्री १०.३० भांडण चालु असतांना आरोपी याने फिर्यादी याच्या मृत्यूस कारण होण्याचा संभव आहे असा 'लाकडी दांडा' हे हल्ल्याचे हत्यार म्हणून वापरून आरोपीने फिर्यादीस डोक्यात मारहाण केली तसेच शिवीगाळ करून दमदाटी केली. या व अशा आशयाचे आरोप संशया पलिकडे जाउन सिध्द होत नाही. जोपर्यंत आरोपींवरील आरोप संशयापलीकडे सिध्द होत नाही तो पर्यंत कायदा आरोपींना निरपराध समजतो. आरोपीचा तो संविधानात्मक हक्क आहे. त्यामुळे वरील परिस्थितीत आरोपीला संशयाचा फायदा देवून त्यास निर्दोष मुक्त करणे न्यायीक, उचीत व क्रमप्राप्त आहे. म्हणून मी **मुद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करिता :-</u>**

**१६.** अभियोग पक्षाचे साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य केले

नसल्याने आरोपींवरील आरोप पुराव्यानिशी सिध्द झालेले नाही. परिणामी **मुद्दा क्र. ४ चे उत्तरादाखल** खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

**१** आरोपी **ओम बाबासाहेब बरांडे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये **भारतीय दंड विधान कलम ३२३, ३२४, ५०४** अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२** आरोपीचे जामीनपत्र व स्वबंधपत्र रद्द करण्यात येतात.

**३** आरोपीने प्रस्तुत न्यायनिर्णयावर अपील झाल्यास, अपीलामध्ये हजर होण्यासंदर्भात **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७-अ** प्रमाणे प्रत्येकी १५,०००/- रु. चे बंधपत्र दाखल करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

PRACHI RADHAKISAN PALWE
Digitally signed by PRACHI RADHAKISAN PALWE
Date: 2026.05.05 13:39:26 +0530

(पी. आर. पालवे)

दिनांक : ०५/०५/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. १२) औरंगाबाद

## भाग - क

## अभियोग पक्षाच्या साक्षीदाराची यादी /बचाव /न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार,पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | संदीप गौतम वाहुळ | घटनास्थळ पंच |
| अ.सा.क्र.२ | सुरजकुमार चौधरी | फिर्यादी |

### ब. बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार,पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार , पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

### क. कोर्ट साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार,पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार , पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| सी.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## भाग - ड

## अभियोग पक्षाचे /बचाव/ कोर्ट निशाणी

### अ. अभियोग

| अनु.क्र. | निशानी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निशानी क्र. १२ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | निशानी क्र. २२ | फिर्यादीस ओळखीपुरती |

**ब-बचाव**

| अनु.क्र. | निशानी क्र. | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशानी**

| अनु.क्र. | निशानी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड. मुददेमाल**

| अनु. क्र. | मुददेमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

PRACHI RADHAKISAN PALWE

Digitally signed by PRACHI RADHAKISAN PALWE
Date: 2026.05.05 13:39:34 +0530

(पी. आर. पालवे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. १२) औरंगाबाद

दिनांक : ०५/०५/२०२६